# योजनांची माहिती

## जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. 1 व 2 सोलापूर

कार्यकारी अभियंता हे या विभागाचे प्रमुख आहेत. या विभागाला केंद्रशासन, राज्यशासन व जिल्हा परिषद यांचेकडुन विविध योजनें अंतर्गत अनुदान प्राप्त हाते. सदर अनुदानातुन प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जि.प.च्या अखत्यारीतील सार्वजनिक इमारती, रस्ते,पुल व मो-या इत्यादी नविन बांधकामे व देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात.

तांत्रिक कामकाज उदा. सर्वेक्षण, आराखडा, अंदाजपत्रक तयार करणे, अंमलबजवणी, देखभाल
व झालेल्या कामांचे मुल्यांकन बांधकाम विभागामार्फत केली जाते.

मा.खासदार,मा.आमदार,स्थानिक लोक प्रतिनिधी,मा.पदाधिकारी,गटविकास अधिकारी, यांचेकडुन आलेल्या प्रस्तावाचे तांत्रिक छाननी करुन सक्षम प्राधिकरणांकडुन सर्वेक्षण मंजूरी घेऊन उपलब्ध अनुदानानुसार सदर प्रस्तावाची अंमलबजावणी केली जाते. ही कामे कार्यकारी अभियंता,उप अभियंता,शाखा अभियंता यांचे पर्यवेक्षणाखाली पुर्ण केली जातात.

**खालील योजनांची प्रशासकिय मंजूरी ही ज्या त्या खात्यामार्फत दिली जाते व त्याच्या बांधकामाची अंमलबजावधी, व तांत्रिक मंजूरी देणे, कामे सुरु करणे व पुर्ण करण्यांची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत केली जाते.**

| अ.क्रं | योजनेचे नांव / लेखाशिर्षकाचे नांव | कोणत्या विभागामार्फत प्रशासकिय मान्यतेची कार्यवाही केली जाते |
|---|---|---|
| 1 | किमान गरजा कार्यक्रम | जिल्हा परिषद सोलापूर बांधकाम विभाग |
| 2 | बिगर किमान गरजा कार्यक्रम | जिल्हा परिषद सोलापूर बांधकाम विभाग |
| 3 | रस्ते विशेष दुरुस्ती | जिल्हा परिषद सोलापूर बांधकाम विभाग |
| 4 | शासकिय इमारती दुरुस्ती | जिल्हा परिषद सोलापूर बांधकाम विभाग |
| 5 | आमदार खासदार स्थानिक विकास कार्यक्रम | जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर |
| 6 | खनिज विकास निधी | खनिज विकास महामंडळ |
| 7 | ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम | जिल्हा परिषद ग्रामपंचायत |
| 8 | 2515 योजनांतर्गत ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते,गटर व अन्य मुलभुत सुविधांची कामे | जिल्हा परिषद बांधकाम विभाग |
| 9 | उर्वरित वैधानिक विकास महामंडळ | जिल्हा परिषद बांधकाम विभाग सोलापूर |
| 10 | जि.प.व पं.स.प्रशासकिय व निवासस्थान देखभाल दुरुस्ती | जिल्हा परिषद बांधकाम विभाग सोलापूर |
| 11 | जि.प.विश्रामगृहे दुरुस्ती | जिल्हा परिषद बांधकाम विभाग सोलापूर |
| 12 | यशवत ग्रामसमृध्दी योजना | जि.प.अंतर्गत ग्रामपंचायत विभाग |
| 13 | दलितवस्ती सुधार योजना | जि.प.समाजकल्याण विभाग |
| 14 | शिक्षण विभागाकडील कामे | जि.प.शिक्षण विभाग |
| 15 | आरोग्य विभागाकडील कामे प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र | जि.प.आरोग्य विभाग |
| 16 | पशुवैद्यकिय दवाखाने बांधणें व दुरुस्ती | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प.सोलापूर |
| 17 | अंगणवाडी इमारती बांधकामे | जि.प.महिला व बालकल्याण विभाग |
| 18 | नैसर्गिक आपत्ती अंतर्गत रस्ते,इमारत,दुरुस्ती | जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर |
| 19 | रोजगार हमी योजना | जिल्हाधिकारी सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| 20 | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना | जिल्हाधिकारी सोलापूर |
| 21 | तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम (क वर्ग) | जि.प.ग्रामपंचायत विभाग |

**जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. 1व 2 सोलापूर**
**बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे नियोजन व आराखडा तयार करण्यांची कार्यपध्दती**
**योजना**

**अ) केंद्र पुरस्कृत**

1) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

2) वित्त आयोग

3) खासदार स्थानिक विकास कार्यक्रम

**ब) राज्य पुरस्कृत**

1) जिल्हा वार्षिक योजनांतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे किमान गरजा कार्यक्रम

2. जिल्हा वार्षिक योजनांतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे बिगर किमान गरजा कार्यक्रम

3) रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम

4) शासकिय इमारती देखभाल दुरुस्ती

5) आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

6) खनिज विकास निधी

7) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना

8) 2515 योजनांतर्गत ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते गटार,व अन्य मुलभूत सुविधांची कामे

9) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ

10) ग्रामीण विकास विभागामार्फत प्रशासकिय इमारत व निवासस्थाने बांधकामे

11) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना

**क) जिल्हा परिषद पुरस्कृत**

1. जिल्हा परिषं्द प्रशासकिय इमारत देखभाल दुरुस्ती

2. जि.प.स्तरावरील अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने देखभाल दुरुस्ती

3. पंचायत समिती प्रशासकिय इमारत देखभाल दुरुस्ती

4. पंचायत समिती स्तरावरील अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने देखभाल दुरुस्ती

5. जिल्हा परिषद विश्रामगृहे देखभाल दुरुस्ती

## अ) केंद्र पुरस्कृत योजना
## प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
## जिल्हा परिषद सोलापूर

**प्रस्तावना**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशातील 80% लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये राहते. या ग्रामीण भागामधील जनतेस त्यांचे राहणीमान व दर्जा उंचावण्यासाठी व त्यांना मुलभूत सुविधा प्राप्त होणेसाठी त्यांचा संपर्क शहरी भागाशी होणे जरुरीचे आहे. ज्यायोगे ही जनता सुखी होऊ शकेल. याकरिता ग्रामीण रस्ते बांधणी हा ग्रामीण विकासातील महत्वाचा घटक आहे. त्यामुळे देशातील आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळू शकते. या देशातील ग्रामीण भागातील रस्त्याच्या विकासासाठी " ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार " यांनी 25 डिसेंबर 2000 पासून ग्रामीण रस्ते बांधणेसाठी "प्रधानमंत्री ग्रामसडक योजना " जाहीर केलेली आहे. या योजनेकरिता केंद्र शासनामार्फत 100 टक्के अनुदान उपलब्ध होते.

ही योजना सुरु झाल्यापासून पहिल्या टप्प्याचे काम फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविली गेली. त्यानंतर मात्र टप्पा 2 पासून ही योजना ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत सर्व जिल्हा परिषदा राबवत आहेत.

**उद्देश**

- या योजनेचा मुलभुत उद्देश हा ज्या खेडयाना रस्ताच उपलब्ध नाही अशा खेडयांसाठी किमान एक बारमाही रस्ता उपलब्ध करुन देणे.
- 500 पेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावासाठी उपलब्ध असलेल्या रस्त्याची सुधारणा करुन बारमाही डांबरीकरणाचा रस्ता उपलब्ध करुन देणे

**योजनेचा निकष**

- या योजनेमधून रस्ता प्रस्तावित करताना, त्या गावाची लोकसंख्या 500 पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. या खेडयांसाठी जर एखादा बारमाही रस्ता उपलब्ध असल्यास दुसरा रस्ता प्रस्तावित करता येणार नाही.
- 500 पेक्षा जास्त लोकसंख्येचे गाव जर मुख्य डांबरी रस्त्यापासून 500 मी अंतराच्या आत असेल तर हे गाव जोडलेले समजणेत येते.
- प्रस्तावित खेडयांसाठी सुचविणेत आलेला रस्ता हा केंद्र शासनाने मंजूर केलेल्या तालुका कोअर नेटवर्क नकाशामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे.
- या योजनेमध्ये फक्त ग्रामीण मार्गच प्रस्तावित करता येतात. म्हणजेच इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग दर्जाचे रस्ते घेता येतात. या वरील दर्जाचे रस्ते या योजनेत प्रस्तावित

करता येत नाहीत.

- या रस्त्याचा प्रस्तावाकरिता जमिन भूसंपादन करता येत नाही. या योजनेकरिता रस्त्यासाठी जमिन उपलब्ध असावी लागते.
- या योजनेतून रस्त्यादुरुस्तीची कामे घेता येत नाहीत.
- रस्ते दर्जोन्नतीची कामे घेता येतात. यासाठी त्या जिल्हातील सर्व महसुल गावे बारमाही रस्त्याने जोडली गेली पाहिजेत. ही दर्जोन्नतीची कामे प्रस्तावित करताना लोकसंख्येच्या प्राधान्यक्रमानुसार घेण्यात येतात.

**प्राधान्यक्रम**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक पुस्तिकेतील सुचनानुसर खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरविणेत आलेला आहे.

- 1000 लोकसंख्येवरील ज्या महसुली खेडयासाठी एकही रस्ता नाही अशा खेडयांसाठी एक बारमाही रस्त्याने जोडणे.
- वरील 1000 लोकसंख्येवरील गावाची यादी पूर्ण झाल्यानंतर 500 ते 1000 मधील गावाची यादी मधील रस्ते घेता येतील. या यादीसाठी जिल्हा घटक घरुन लोकसंख्येच्या उतरत्या प्राधान्यक्रमानुसार कामे प्रस्तावित करणे.
- कोअर नेटवर्कमधील थ्रूरुट रस्त्याची दर्जोन्नती करणे.
- कोअर नेटवर्कमधील लिंकरुट रस्त्याची दर्जोन्नती.

**केंद्रशासन वेबसाईट**

या योजनेची केंद्र शासनाची जनतेकरिता स्वतंत्र वेबसाईट आहे या साईटचा पत्ता www.omms.nic.in असा आहे. या साईटवर जिल्हानिहाय संपूर्ण कामनिहाय माहिती उपलब्ध होऊ शकते.

**जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. 1 व 2 सोलापूर**

**2) वित्त आयोग**

**अ)** केंद्र शं्सनाच्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार पंचायत राज्य संस्थाना बळकटी करणांसाठी जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध हाते. सदर निधीतुन जिल्हा परिषद स्तर, पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरावर शासनाकडील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे मंजूर कामांची अंमलबजावणी ह्या विभागामार्फत करण्यांत येते.

**1) जिल्हा परिषद स्तर (शासन निर्णय क्रं.बाविआ-2005/प्रक्रं.390/ वित्त-4/दि.3.12.2005)**

1. मोठ्या पाणी पुरवठ्या योजनांचे पुनरुज्जीवन व विस्तारीकरण
2. गावांतर्गत सिमेंट कॉंक्रिटची गटारे व अनुषंगीक रस्ते
3. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी पाणी पुरवठा व स्वच्छता सोई सुविधा पुरविणे

4. प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती व रुग्णांसोबत येणा-या व्यक्तीसाठी सुविधा

5. ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम

6. फॉगिग मधिन जलशुध्दीकरणयंत्रणा इ.साहित्य जिल्हा परिषद आवश्यकतेनुसार राज्य शासनाच्या पुर्व परवानगीने खरेदी करु शकतात.

**2) पंचायत समिती स्तर (शासन निर्ण्य क्रं.बाविआ-2005/प्रक्रं.390/ वित्त-4/दि.3.12.2005)**

1. शाळामध्ये शुध्द पाण्याची व्यवस्था व स्वच्छतागृहाची दुरुस्ती

2. दहन व दफनभुमी व्यवस्था

3. अंगणवाडी दुरुस्ती देखभाल व सोई सुविधा

4. प्राथमिक शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती

5. पशुवैद्यकिय दवाखाने दुरुस्ती व सुविधा

**3) ग्रामपंचायत स्तर (शासन निर्ण्य क्रं.बाविआ-2005/प्रक्रं.390/वित्त-4/दि.3.12.2005)**

1. पाणी पुरवठा योजना दुरुस्ती व देखभाल

2. गटारे व अनुषंगीक रस्ते दुरुस्ती व देखभाल

3. सार्वजनिक संडास दुरुस्ती

4. ग्रामस्वच्छता व घन कचरा व्यवस्थापन (टॅक्टर,ट्रॉली इ.ची खरेदी व दुरुस्ती धरुन)

5. धुरीकरण मशिन व त्यासाठी औषधे खरेदी तसेच मुख्य उद्दिष्टांना धं्रुन इतर अनुषंगीक कामे

6. ग्रामपंचायत कार्यालय देखभाल व दुरुस्ती

12 वा वित्त आयोगातुन कामे मंजूर करतांना खालीलप्रमाणे निर्बंध घालणेत आलेले आहेत.

* सदरचा निधी वेतन व भत्ते व कार्यालयीन कामासाठी खर्च करता येणार नाही.
* वाहने खरेदी करता येणार नाहीत
* पाणी पुरवठ्याच्या नवीन योजनांसाठी खर्च करता येणार नाही.
* राज्य व केंद्र शासनाने बंदी घातलेल्या बाबीवर खर्च करता येणार नाही.
* जागतीक बँकेकडुन केंद्र सरकारच्या जलस्वराज्य प्रकल्प इ.कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या योजनांवर या अनुदानातुन खर्च करता येणार नाही.
* जिल्हा परिषद पचायत समिती स्तरावर योजनेची निवड करतांना त्या बाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यांत यावा. या अनुदानातुन घेण्यांत येणारी योजना कामे (कामाच्या स्थान निश्चितीसह) त्याच सर्वसाधारण सभेमध्ये अंतिम होणे गरजेचे आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणा-या निधीमधुन मा. आमदार व लोक प्रतिनिधीनी शिफारस केलेली रस्ते नुतनीकरणांची मंजूर कामे ह्या विभागांमार्फत करण्यांत येतात.

## खासदार स्थानिक विकास कार्यक्रम

सदर योजनांतर्गत मा.खासदार यांचेकडुन त्यांच्या मतदार संघात विविध विकास कामे प्रशासकिय मंजूरी देण्यांसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे कामांची यादी प्रस्तावित करण्यांत येते.

मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेल्या कामांची ह्या विभागा मार्फत अंमलबजावणी केली जाते.

सदर योजनेतुन खालीलप्रमाणे कामे अनुज्ञेय आहेत.

* शाळांच्या इमारतींची बांधकामे
* पिण्याच्या पाण्याच्या योजना घेण्यांस सहायक होणारी कामे
* ग्रामीण रस्ते तसेच पोहोच मार्ग
* पोच मार्गावरीलपुल
* वृध्द व अंपगासाठी सामुहिक निवारा
* स्थानिक संस्थासाठी किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रिडाविषयक कार्यक्रमांसाठी अथवा दवाखान्याच्या इमारतीची बांधकामे
* शासकिय किंवा सामुहिक जमिनीवर सामाजिक वनीकरण वन शेती फलोद्यान बागा व उद्याने उभारणे
* गावतळयातील गाळ काढणे
* पाटबंधा-या अंतर्गत घ्यावयाची बांधकामे
* सार्वजनिक उपयुक्तता असलेली सामुहीक गोबरगॅस किंवा अपारंपारीक उर्जा निर्मितीची यंत्रणा
* छोटे पाटबंधारे उपसा जलसिंचन योजना किंवा भू गर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यांसाठी घ्यावयाचे कार्यक्रम
* सार्वजनिक वाचनालये किंवा अभ्यासिका
* पाळणा घरे व अंगणवाड्या
* सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी इमारती ज्यात कुटूंब कल्याण उपकेंद्र व एएनएम चा समावेश असू शकतो अशी कामे
* स्मशानभूमी कंव दफनभूमी कामे
* सार्वजनिक स्वच्छतागृहे किंवा स्नानगृहाची बांधकामे
* जलनिस्सारणाची व गटरांची बांधकामे (डेनेज ॲन्ड गटर्स)
* फुटपाथ पाऊलवाटा आणि पादचारी पुलांची बांधकामे
* वीज पुरवठा पाणी रस्ते किंवा सार्वजनिक स्वच्छतागृह (सार्वजनिक शहरातील नगरातील खेडे गावातील स्वच्छतागृह झोपडपट्ट्यात सोयी उपलब्ध करणे तसेच

झोपडपट्टीतील कारागीरासाठी सामुहीक कार्यशाळा) वर्कशेड उभारणे.

* आदिवासी भागात निवासी शाळा बांधणे

* बस शेड्स तसेच सार्वजनिक वाहतुक व्यवस्थासाठी बस थांबे बांधणे

* पशुं वैद्यकिय मदत केंद्र

**बसत नसणा-या कामांची यादी**

* ही कामे जिल्हा योजनेच्या व्याप्तीमध्ये येत नाहीत

* कार्यालयीन इमारतीः केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कार्यालयाच्या अथवा त्यांच्यशी संबधित असलेल्या संस्थांच्या कार्यालयाच्या इमारती, निवासी इमारती दुरदर्शनकेंद्र किंवा तत्सम इमारतींची बांधकामे

* व्यापारी संस्था रजिस्टर्ड सोसायट्या खाजगी संस्था अनुदान प्राप्त संस्था किंवा सहकारी संस्थाच्या इमारती

* ज्या कामांची किंमत रु.25 लाखापेक्षा अधिक असेल अशी कामे

* कोणत्याही प्रकारची दुरुस्ती किंवा देखभालीची कामे

* अनदान किंवा कर्ज

* स्मारके किंवा समरांच्या इमारती

* कोणत्याही प्रकारची सामुग्री किंवा वस्तुंची खरेदी

* भू संपादन किंवा भू संपादनासाठी मोबदला

* वैयक्तिक लाभ देणारी मालमत्ता (तथापी एखाद्या मंजूर योजनेचा भाग म्हणून वैयक्तिक लाभ देणारी कामे होण्यांस हरकत नाही)

* धार्मिक उपासनेची ठिकाणे

* कोणतीही अपुर्ण कामे पुर्ण करण्यांसाठी एकस्त्रोत म्हणून निधी वापरणे

**ब) राज्य पुरस्कृत**

जिल्ह्यातील विविध विकास कामे राबविण्यांसाठी ठराविक नियतव्यय शासनाने जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडे सुपूर्त करते. जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सभा घेऊन जिल्ह्यातील विविध विकास कामांचे नियोजन करते.

जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडुन खालील स्वरुपाची कामे मंजूर केली जातात.

1. किमान गरजा कार्यक्रम (ग्रामीण अंतर्गत काँक्रिट रस्ते करणै व इतर रस्ते)
2. बिगर किमन गरजा कार्यक्रम (रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण)
3. अंगणवाडी बांधकाम
4. नविन प्राथमिक केंद्र,उपकेंद्र,इमारत
5. नविन पशुं दवाखाने इमारत,

6. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास

7. दहन / दफन भूमी शेड,कंपाऊंड

8. दहन / दफन भूमीसाठी संरक्षक भिंत

**3) रस्ते विशेष दुरुस्ती**

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी एकुण 9562.90 कि.मी. लांबी रस्ता असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

## रस्ते विशेष दुरुस्ती

### मध्यावधी पूर्नविलोकनाप्रमाणे सुधारित 1981-2001 दर्जा व पृष्ठभागानुसार रस्त्याची अदयावत माहिती..(लांबी किमी.)

| तालुका | प्रजिमा | | | | इजिमा | | | | ग्रामा | | | | एकुण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुरुमी | खडी | डांबरी | एकुण | मुरुमी | खडी | डांबरी | एकुण | मुरुमी | खडी | डांबरी | एकुण | मुरुमी | खडी | डांबरी | एकुण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| अ.कोट | 12.00 | 40.50 | 67.50 | 120.00 | 33.50 | 79.50 | 84.80 | 197.80 | 163.20 | 66.054 | 299.90 | 529.145 | 208.70 | 186.045 | 452.20 | 846.945 |
| बार्शी | 32.00 | 85.5 | 110.00 | 227.500 | 8.100 | 43.200 | 140.200 | 191.500 | 146.100 | 322.700 | 151.60 | 620.600 | 186.200 | 451.400 | 402.00 | 1039.60 |
| माढा | 7.70 | 109.87 | 96.45 | 214.02 | 5.00 | 87.58 | 91.82 | 184.40 | 67.50 | 558.29 | 101.115 | 726.90 | 80.220 | 755.735 | 289.358 | 1125.340 |
| मोहोळ | 4.00 | 24.00 | 30.10 | 58.10 | 23.23 | 120.66 | 58.830 | 229.75 | 146.35 | 210.13 | 120.42 | 476.90 | 174.58 | 354.79 | 236.38 | 765.75 |
| उ.सोलापूर | 0.00 | 6.900 | 41.3000 | 48.20 | 17.00 | 6.500 | 40.400 | 63.90 | 58.00 | 40.480 | 99.250 | 198.00 | 75.00 | 53.88 | 181.220 | 310.10 |
| द.सोलापूर | 4.77 | 27.700 | 6.530 | 39.00 | 11.00 | 70.600 | 57.650 | 139.25 | 166.00 | 263.530 | 93.220 | 495.75 | 181.77 | 334.83 | 157.40 | 674.00 |
| **एकूण** | **60.47** | **294.47** | **351.88** | **706.82** | **97.83** | **408.04** | **473.70** | **1006.60** | **747.15** | **1461.18** | **865.51** | **3047.30** | **906.47** | **2136.68** | **1718.56** | **4761.74** |
| करमाळा | 0.00 | 104.200 | 171.20 | 275.40 | 5.04 | 72.80 | 118.20 | 196.04 | 170.90 | 312.40 | 122.90 | 606.20 | 175.94 | 489.40 | 412.30 | 1077.64 |
| मंगळवेढा | 0.500 | 54.31 | 20.80 | 75.61 | 7.00 | 128.90 | 73.80 | 209.70 | 137.00 | 320..715 | 62..135 | 519.85 | 144.50 | 503.93 | 156.74 | 805.16 |
| माळशिरस | 0.00 | 0.00 | 140.00 | 140.00 | 37.80 | 52.00 | 161..20 | 251.00 | 181.40 | 179.100 | 248.25 | 608.75 | 219.20 | 231.10 | 549.45 | 999.75 |
| पंढरपूर | 28.70 | 42.56 | 77.80 | 149.06 | 23.80 | 52.10 | 91.20 | 167.10 | 136.00 | 174.80 | 141.20 | 452.00 | 188.50 | 269.46 | 310.20 | 768.16 |
| सांगोला | 17.50 | 10.00 | 46.50 | 74.00 | 52.00 | 85.93 | 119.77 | 257.70 | 337.75 | 349.20 | 131.80 | 818.75 | 407.25 | 445.13 | 298.07 | 1150.45 |
| **एकुण..** | **46.70** | **211.07** | **456.30** | **714.07** | **125.64** | **391.73** | **564..17** | **1081.54** | **963.05** | **1336.22** | **706.285** | **3005.55** | **1135.39** | **1939.02** | **1926.76** | **4801.16** |
| **एकुणांत** | **107.17** | **505.54** | **808.18** | **1420.89** | **223.47** | **799.77** | **473.70** | **2088.14** | **1710.20** | **2797.40** | **1571.80** | **6052.85** | **2041.86** | **4075.70** | **3645.32** | **9562.90** |

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी अनुदान उपलब्ध होते. सदर अनुदानातुन खालील नमुद केलेल्या चार गटातील कामे प्रामुख्याने घेण्यांत येतात. सार्वजनिक बांधकाम वि.मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रं.आरएमआर/2002/प्रक्रं.109/ दि.4.6.02

**गट अ (रस्ते वाहतुक योग्य स्थितील राखण्याची कामे)**

सदर कार्यक्रम मा.अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ सोलापूर यांचे स्तरावर मंजूर करण्यांत येतो.

1. खड्डे भरणे (शासन परिपत्रक संकीर्ण-0798/168/भाग-1/रस्ते-1/दि.23.5.2002) प्रमाणे
2. डोंगरी गटारे खणणे व सुस्थितीत राखणे
3. अस्तित्वातील गटारे पुरेशी खोल राखणे
4. अस्तित्वातील गटारांना अस्तरीकरण करणे
5. नवी गटारे खणणे
6. बाजूपट्टया तासणे/ बाजूपट्टयांचा योग्य उतार
7. उखडलेले खूंडे, पॅरपेट इत्यादीची पुर्नबांधणी
8. किरकोळ स्वरुपात वाहून गेलेल्या भरावाची पुर्नस्थापना

**गट ब (रस्त्याचा दर्जा टिकविण्यांची / सुधारण्यांची कामे)**

सदरचा कार्यक्रम श्ांसन स्तरावर मंजूर करण्यांत येतो.

1. रस्त्याची विशेष दुरुस्ती / सुधारणा
2. डांबरी नुतनीकरण
3. थेट रस्ते नुतनीकरण
4. थेड रस्ते सुधारणा
5. खंूडी नुतनीकरण
6. रुंदीकरण

**गट क (विशिष्ट प्रयोजनाची कामे)**

सदरचा कार्यक्रम शासनाचीपुर्णसहमती घेऊन मुख्य अभियंता स्तरावर मजूर करण्यांत येतो.

सदरच्या कार्यक्रमांत खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

1. अपघात प्रवण क्षेत्रांची सुधारणा
2. अपघात प्रवण क्षेत्रांची सुधारणा वगळून अन्य अभियांत्रिकी सुधारणा
3. कमकुवत पुलांची तसेच मोठ्या पुलांची दुरुस्ती/मजबुतीकरण
4. गावे बारमाही रस्त्याने जोडयांसाठी मुरुमी रस्त्यांचे खडीकरण
5. गावे बारमाही रस्त्याने जोडण्यांसाठी मोठ्या व लहान रस्त्यांची मुळ कामे
6. लहान मो-यांची सुधारणा

**गट ड**

सदरचा कार्यक्रम मा. मुख्य अभियंता यांच्या पुर्व सहमतीनंतर मा.अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर मंजूर करण्यांत येतो

सदरच्या कार्यक्रमात उपरोक्त गट अ गट ब गट क मध्ये समाविष्ट नसणा-या प्रकारची कामे घेण्यांत येतात.

## 4) शासकिय इमारत देखभाल दुरुस्ती

जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेंत्रातील शासकिय इमारती (एक्स डी एल बी) च्या दुरुस्तीसाठी अधीक्षक अभियंता,सा.बां. मंडळ सोलापूर यांचे स्तरावर कार्यक्रम मंजूर करण्यांत येतो.

सदरच्या कार्यक्रमांत खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

सी.आर.1 दरवाजे व खिडक्या दुरुस्ती करणे, बिजागिरी.

सी.आर. 2 दरवाजे व खिडक्याच्या झडपा, चौकटी दुरुस्ती करणे.

सी.आर. 3 पाणीपुरवठा व जलनिस्सारण कामाची दुरुस्ती करणे.

सी.आर. 4 दरवाजे, खिडक्या, भिंतीचे रंग, ठिगळे इत्यादी खरडणे.

सी.आर. 5 फरशी दुरुस्ती करणे.

सी.आर. 6. दर्जा व अस्तरीकरण दुरुस्ती.

सी.आर. 7 अर्ध कौले उलटापालट करणे, फुटलेली कौले बदलणे, गळती थांबविणे. गळती प्रतिबधनक मात्रा देणे.

सी.आर. 8 पावसापासून संरक्षण करणे. उदा. बाबू, छतापासून.

सी.आर. 9 विद्युत वॉयरीग दुरुस्ती व बटणे इ. बसविणे.

सी.आर. 10 वरील प्रमाणे काम करणे. उदा. अन्य वावामध्ये अंर्तभूत न होणारे.

--------------------xx------------------

एस.एल.आर. 1 अर्ध छताची दुरुस्ती

एस.एल.आर. 2 जलरंग व रंग

एस.एल.आर. 3 पाणीपुरवठा व जलनिस्सारणाची पाईप बदलणे.

एस.एल.आर. 4 ठराविक मुदतीचे तेलरंग करणे.

एस.एल.आर. 5 ठराविक मुदतीनंतर करावयाचे वॉयरीग

एस.एल.आर. 6 भिंतीचे अस्तरीकरणे.

एस.एल.आर. 7 कोणत्याही प्रकारचे क्षती पोहोचलेल्या इमारतीच्या भागाची दुरुस्ती करणे.

**मा.मुख्य अभियंता यांचेकडील मान्यता असलेली कामे**

एस.डी.आर. 1 जुने पध्दतीचे छताची मंगलौरी कौले, सिमेंट पत्रे इ. नुतनीकरण करणे.

एस.डी.आर. 2 किडलेली दरवाजे व खिडक्याचे नुतनीकरण.

एस.डी.आर. 3 पाणीपुरवठयांचे पाईप मधील गळती थांबविणे.

एस.डी.आर. 4 गंजप्रतिबंधक करणे.

एस.डी.आर. 5 कालबाहय झालेल्या विद्युतकरणाचे नुतनीकरण करणे.

एस.डी.आर. 5अ विद्युत जनरेटर, पंप इ. बदलणे जणेकरुन आयुष्यमान संपलेले.

एस.डी.आर. 6 गळतीमुळे ओल्या झालेल्या भिंतीचे अस्तरीकरण करणे.

एस.डी.आर. 7 ओलावा व गळती थांबविणेकामी गळप्रतिबंधक योजना करणे.

एस.डी.आर. 8 काळया मातीतील इमारतीस जोते संरक्षक योजना करणे.

एस.डी.आर. 9 जोतेलगत सांडपाण्याची व्यवस्था करणे. जेथे पाणी मुरते.

एस.डी.आर. 10 वीटेचे खांब/ भिंती नव्याने बांधणे, जेथे भेगा पडल्या आहेत.

एस.डी.आर. 11 मोसमी आडोसाचे बदल करणे.

एस.डी.आर. 12 फरशीकरणाचे नुतनीकरण करणे.

## 7) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मुलभुत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने सदर योजनेची राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करण्यांत येते.

जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या सभेत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रस्तावित तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास "क" वर्ग तीर्थक्षेंत्र अंतर्गत मंजूरी दिली जाते. जिल्हा स्तरावर जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानाुन "क" वर्ग मंजूर असणा-या तीर्थक्षेत्रांच्या विकास कामांना जि.प.स्तरावर मंजूरी दिली जाते.

तसेच राज्यस्तरीय तरतुदी अंतर्गत तीर्थक्षेत्र विकास कामांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडुन शासनांकडे सादर करण्यांत येते. शासनांकडुन निधी मंजुर झालेनंतर सदर कामांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत केली जाते.

ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनांतर्गत खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

1. सार्वजनिक शौचालय
2. पाणी पुरवठा
3. धर्मशाळा/यात्रीनिवास
4. वाहनतळ
5. संरक्षक भिंत / घाट
6. पथदिवे

## 8) 2515 अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण

ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते,गटारे व अन्य मुलभूत सुवधिांच्या लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांसाठी विशेष निधी शासनांकडुन उपलब्ध होतो.

सदर योजनेंतर्गत शासन निर्णय विकास/2009/प्रक्रं.8/पंरा-8/दि.24.2.09 अन्वये खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

1. गावांतर्गत रस्ते व गटारे
2. तदनंतर अन्य कामे निकडीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार मुलभूत सुविधांची कामे.

## 9) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ

विविध ग्रामपंचायत स्तरावरील लोक प्रतिनिधीं, ग्रामपंचायत यांनी खाली अनुज्ञेय यादीतील कामांची मागणी या विभागाकडे केलेनंतर जागेचा दाखला,देखभाल दुरुस्ती हमीपत्र व अंदाजपत्रकांसह परिपुर्ण् प्रस्ताव सदस्य सचिव उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ मुंबई यांचेकडे सादर केला जातो. प्रस्तावावर मंत्रालयीन प्रशासकिय विभाग व नियोजन विभागाकडुन निधी वितरीत झालेनंतर शासन निर्णय दि.15.7.08 नुसार कामांना प्रशासकिय मान्यता देणैत येते. पुढील कामांची अंमलबजावणी या विभागामार्फत करणेंत येते. या योजनेतुन खालीलकामे अनुज्ञेय आहेत. (शासन निर्णय क्रं.नियो/कार्या-3/उमवैविमं/विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विधानभवन पुणे-1 दि.22.7.)

1. लघुपाटबंधारे (राज्यक्षेत्र)
2. लघुपाटबंधारे (स्थानिक क्षेत्र)
3. ग्रामीण रस्ते
4. गांवाना जोडणारे रस्ते (ॲप्रोच रोड्स)
5. प्राथमिक शाळा खोल्यांची बांधकामचे व दुरुस्ती
6. शासकिय औद्यौगिक प्रशिक्षण संस्थांची बांधकामे व आवश्यक ती साहित्य खरेदी
7. तांत्रिक शाळांची बांधकामे व आवश्यक ती साहित्य खरेदी
8. +2 स्तरावर शिक्षणांच्या व्यावसायिकरणां संबधीच्या योजनांना अनुदान
9. प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र यांचे बांधकामे व आवश्यक ती साहित्य खरेदी
10. ग्रामीण रुग्णालयांची बांधकामे व आवश्यक ती साहित्य खरेदी
11. शासकिय रुग्णालयांसाठी यंत्रसामुग्री खरेदी
12. ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत मुनलिका/ विंधन विहीर/ नळाने पाणी पुरवठा
13. मृदसंधारणांची कामे
14. कृषी पॉलिक्लिनिक
15. सामाजिक वनिकरणांची कामे

16. पाणलोट क्षेत्र विकासाची कामे

17. कृत्रिम रेतन केंद्र/उपकेंद्र व पशुवैद्यकिय दवाखाने सुरु करण्यांसाठी अनुदान

18. ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम व गावातील सार्वजनिक स्वच्छतागृह

(ग्रामपंचायतीने देखभालीची जबाबदारी स्वीकारण्याच्या अटीवर)

19. दुग्धशाळा, शीतकरण केंद्राची उभारणी व विस्तार

20. मत्स्यमारी बंदरे व जेट्टीची बांधकामे

21. महिला/अपंगासाठी असलेल्या शासकिय योजनांकरिता अनुदान

22. पर्यावरण विषयक बाबी

### क) जिल्हा परिषद पुरस्कृत

जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील प्रशासकिय इमारतीच्या व अधिकारी/कर्मचारी निवासस्थानाची देखभाल दुरुस्तीच्या प्रस्तावांवर शासन निर्णय दि.15 जुलै 2008 च्या प्रमाणे प्रशासकिय मान्यता घेऊन कामांची अंमलबजावणी केली जाते.

जिल्हा परिषद सेस अंतर्गत खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

1. जिल्हा परिषंद प्रशासकिय इमारत देखभाल दुरुस्ती

2. जि.प.स्तरावरील अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने देखभाल दुरुस्ती

3. पंचायत समिती प्रशासकिय इमारत देखभाल दुरुस्ती

4. पंचायत समिती स्तरावरील अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने देखभाल दुरुस्ती

5. जिल्हा परिषद विश्रामगृहे देखभाल दुरुस्ती

## 11) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 2005 अंतर्गत दि.1 एप्रिल 2008 पासुन महाराष्ट्र शासनानें मुळ रोजगार हमी योजना बंद करुन नविन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत 50% कामे ग्रामपंचायती मार्फत केली जातात. व 50% कामे विविध शासकिय यंत्रणामार्फत केली जातात.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खालील कामे अनुज्ञेय आहेत.

1. जलसंधारण व जलसाठ्याची कामे

2. दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनिकरण व वृक्षलागवड यासह)

3. जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे)

4. अनुसूचित जाती/जमाती,नविन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमीनीसाठी जलसिंचन निर्माण करण्यांची कामे

5. पारंपरिक पाणी साठ्याचे नुतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे

6. भूविकासाची कामे

7. पूर नियंत्रण व पूर संरक्षणांची कामे, पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे

8. ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्याची कामे

9. राज्य शासनाशी सल्लामसलत करुन केंद्र शासनाने घोषीत केलेली कामे.

बांधकाम विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांनी वरील नमुद कामापैकी ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्याची कामे करण्यांत येतात. प्रत्येक गावाच्या ग्रामसभेने मंजूर केलेल्या कामांची शिफारस संबधित पंचायत समितीकडुन मंजूर होऊन ती जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडुन मंजूरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आराखडा तयार होतो. ग्रामपंचायतीनी सुचविलेल्या कामांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे प्रशासकिय मान्यता देतात. यंत्रणेकडील कामांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना शाखा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेमार्फत प्रशाकिय मान्यता दिली जाते.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांना मक्तेदार नेमता येत नसल्याने सर्व कामे मजूरांमार्फत केली जातात. सर्वसाधारणपणे मजूरांना 7 दिवसाचे आंत मजुरी देणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक कुटूंबाला रोजगार कुटूंब प्रत्रक दिले जाते. मजूरांनी कामाची मागणी केल्यानंतर 15 दिवसात काम उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. अन्यथा बेराजगार भत्ता रोजगार कुटूंब पत्रक असलेल्या मंजूरांना देय आहे. प्रत्येक कुटूंबाला 100 दिवस रोजगार देण्यांची जबाबदारी राज्य शासनांवर आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे संपुर्ण सनियंत्रण हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचे कडे आहे.